॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

✲ सुविचार ✲
या जगात सर्वात सोपी आणि निरुपयोगी गोष्ट म्हणजे चिंता करणे.

▪ अहिल्यानगर ▪ मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६ ▪ वर्ष ६ वे ▪ अंक २४३ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ▪ 9420802145

# चोंडीच्या विकासातून पर्यटनाला चालना मिळणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस । श्री क्षेत्र चोंडी विकास आराखडा आढावा बैठक

**● मुंबई । वीरभूमी –**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा आदर्श कायम स्मरणात राहणार आहे. त्यांच्या जीवनकार्यातून नवीन पिढीला प्रेरणा मिळावी, या उद्देशाने चौंडी गावाचा विकास करण्याच्या दृष्टीने अनेक विकासकामे हाती घेण्यात आलेली आहेत. चोंडीचा विकास सर्वसमावेशक व नियोजनबद्ध पद्धतीने करत दर्जेदार सुविधांच्या माध्यमातून पर्यटनास चालना देण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिस्थळ, चोंडी येथील जतन, संवर्धन व विकास आराखड्यासंदर्भात बैठक वर्षा निवासस्थान येथे झाली. या बैठकीस विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलींद म्हैसकर, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी, नियोजन विभागाच्या शैला ए, जलसंपदा विभागाचे सचिव डॉ. संजय बेलसरे, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया तसेच संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, चोंडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिस्थळाच्या सर्वांगीण विकासासाठी ६८१ कोटींची तरतूद करण्यात आली असून, या प्रकल्पांतर्गत स्मारक परिसरात भव्य पुतळा, सुशोभित उद्यान, नदीकाठाचा विकास, आधुनिक संग्रहालय, ओपन एअर थिएटर आणि पर्यटन सुविधा केंद्र उभारण्यात येणार आहेत. स्मारक परिसरात कायमस्वरूपी पाण्याची उपलब्धता करण्यासाठी जलव्यवस्थापनाच्या उपाययोजनांवर विशेष भर देण्यात यावा. तसेच हरित क्षेत्र आणि मोकळ्या जागांचा समतोल राखत परिसराचे सौंदर्यीकरण करावे.

बुडीत बंधाऱ्यांऐवजी 'बॅरेज' उभारण्याबाबत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करावी. मंदिर परिसरातील भूसंपादन जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून करावे. प्रकल्पातील काही सुविधा उभारणी व देखभालीसाठी खासगी भागीदारी (पीपीपी मॉडेल) आणण्याबाबत सकारात्मक विचार सुरू असून, यामुळे पर्यटन सुविधा अधिक दर्जेदार, कार्यक्षम व दीर्घकालीन टिकाऊ पद्धतीने विकसित करता येणार असल्याचे श्री फडणवीस म्हणाले.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ३६० कोटींच्या रस्ते प्रकल्पातील दोन कामांसाठी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. प्रकल्पासाठी आवश्यक जागेच्या सीमारेषा निश्चित करण्यासाठी वन, सार्वजनिक बांधकाम, जलसिंचन विभाग आणि ग्रामपंचायत यांनी संयुक्त मोजणी केली असून सीमारेषा निश्चित करण्यात आल्या आहेत. चोंडी येथील स्मारकाचा विकास नियोजनबद्ध पद्धतीने आणि टप्प्याटप्प्याने केला जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे म्हणाले, चोंडी विकास आराखड्यात इतिहास, संस्कृती आणि पर्यटन यांचा समन्वय साधत स्थानिक विकास व रोजगारनिर्मितीला चालना देण्याचा शासनाचा मानस आहे. याशिवाय परिसराचे सौंदर्यीकरण, जलसौंदर्य, हरित क्षेत्र, तसेच पर्यटकांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करून चोंडीला आकर्षक पर्यटनस्थळ म्हणून उभारण्याचे नियोजन आहे.

## SPOT NEWS

### ग्रामपंचायत पोटनिवडणूक; ६४ जागांसाठी आज मतदान

**● अहिल्यानगर –** जिल्ह्यातील पाच ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी व रिक्त झालेल्या सदस्यपदांच्या ८५ जागांसाठी राज्य निवडणूक आयोगाने पोटनिवडणूक जाहीर केली होती. यातील सदस्यपदाच्या बिनविरोध आलेल्या जागा वगळून इतर सर्व जागांसाठी आज (दि. २८) सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० या वेळेत मतदान पार पडणार असून २९ एप्रिल रोजी तहसील कार्यालयात मतमोजणी होणार आहे. २०22 मध्ये पार पडलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीनंतर राजीनामा, निधन, अनहर्त यासह इतर कारणांमुळे रिक्त झालेल्या जिल्ह्यातील ६४ ग्रामपंचायतींमध्ये पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली होती. यात ८५ ग्रामपंचायत सदस्य व ५ सरपंचपदांचा समावेश होता. या जागांसाठी आज मतदान प्रक्रिया पार पडत आहे. जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतींच्या ८५ सदस्यपदांच्या रिक्त जागांसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली होती. यातील २१ जागा बिनविरोध निवडून आल्या आहेत. यात अकोले तालुक्यातील ७ जागा, शेवगाव व कोपरगाव तालुक्यातील प्रत्येकी ३ जागा, नगर व नेवासा तालुक्यातील प्रत्येकी २ जागा, संगमनेर, राहाता, श्रीरामपूर व पाथर्डी तालुक्यांतील प्रत्येकी १ जागा बिनविरोध निवडून आली आहे. यामुळे आज ६४ जागांसाठी मतदान होणार आहे.

### बोगस बियाणे रोखण्यासाठी सरकारची कडक नियमावली

**● मुंबई –** शेतकऱ्यांना दर्जेदार आणि गुणवत्तापुर्ण बियाणे उपलब्ध व्हावे यासाठी येत्या खरीप हंगामापासून बियाण्यांची डीएनए फिंगर प्रिंट टेस्ट केली जाणार आहे. बियाणे कायदा व बियाणे नियंत्रण आदेशांचे काटेकोर न केल्यास व शेतक-यांना बनावट व निकृष्ट बियाणे दिल्यास उत्पादक आणि विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिला आहे. तसेच बियाण्यांची नोंद ठेवण्यासाठी 'साथी' पोर्टलचा वापर बंधनकारक करण्यात आला असून बियाणे उत्पादक ते शेतकरी या संपूर्ण प्रक्रियेत बियाण्यांची नोंद डिजिटल साखळीच्या स्वरूपात करण्यात येणार आहे.

## बेलापुरचा भोंदू गणेश शिंदेला अटक

**● श्रीरामपूर । वीरभूमी –**
श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर परिसरात आजार बरा करण्याच्या आमिषाने एका असहाय महिलेवर तब्बल तीन वर्षे लैंगिक अत्याचार करणाऱ्या आणि सुमारे २० लाख रुपये उकळणाऱ्या 'भोंदू' गणेश शिंदे याला श्रीरामपूर शहर पोलिसांनी अटक केली आहे. याच्याविरुद्ध बलात्कार आणि जादूटोणा विरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बेलापूर परिसरातील खटकळी येथे राहणारा गणेश माधवराव शिंदे हा स्वतःला दैवी शक्ती लाभलेली असल्याचे भासवत नागरिकांची फसवणूक करत होता. पीडित महिला श्रीरामपूर परिसरातील रहिवासी असून, २०२३ मध्ये तिला पोटाच्या अल्सरचा त्रास होत होता. त्यावेळी आरोपी उपचार करतो, अशी माहिती मिळाल्यानंतर ती त्याच्या आश्रमात गेली. तेथे आरोपीने तिला लिंबू, उदी व तथाकथित धार्मिक विधींच्या माध्यमातून उपचार सुरू असल्याचा आभास निर्माण केला.

या काळात आरोपीने 'दक्षिणा'च्या नावाखाली पीडितेकडून पैसे व सोन्याची मागणी केली. आजार बरा होईल या आशेवर आणि भीतीपोटी पीडिता त्याच्या जाळ्यात अडकली. आतापर्यंत तिच्याकडून सुमारे १८ ते २० लाख रुपये उकळल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

## पुणे रेल्वे स्थानकावर वंदे भारत एक्स्प्रेसचा डबा रुळावरून घसरला

**● पुणे । वीरभूमी –**
मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसहून सोलापूरच्या दिशेने जाणाऱ्या २२२२५ वंदे भारत एक्स्प्रेसला सोमवारी संध्याकाळी पुणे रेल्वे स्थानकात प्रवेश करताना अपघात झाला. या घटनेत ट्रेनच्या एका डब्याची ट्रॉली रुळावरून घसरली, मात्र सुदैवाने सर्व प्रवासी सुरक्षित असून कोणतीही जीवितहानी झालेली नाही.




सोमवारी संध्याकाळी ७:१५ ते ७:३० च्या सुमारास वंदे भारत एक्स्प्रेस पुणे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ३ कडे येत होती. स्थानकातील 'डायमंड क्रॉसिंग' वरून जात असताना चौथ्या डब्याची एक ट्रॉली (चाकांचा संच) रुळावरून खाली उतरली. रेल्वेचा वेग कमी असल्याने मोठा अनर्थ टळला. डबा घसरल्याचे लक्षात येताच रेल्वे प्रशासनाने तातडीने बचावकार्य सुरू केले.

रेल्वेच्या प्राथमिक माहितीनुसार, ज्या डायमंड क्रॉसिंगवर हा अपघात झाला, ते आधीच बदलण्याचे नियोजित होते. पुणे रेल्वे स्थानकावर सध्या ३९८ कोटींच्या यार्ड रिमॉडेलिंगचे काम सुरू आहे. रेल्वे प्रशासनाने या घटनेनंतर संबंधित डायमंड क्रॉसिंग तातडीने बदलण्याचे निर्देश दिले आहेत. मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी स्वप्नील निला यांनी स्पष्ट केले की, देशभरातील अशा सर्व 'नॉन-स्टँडर्ड' डायमंड क्रॉसिंगला प्राधान्याने बदलले जात आहे.

अपघातानंतर अडकून पडलेल्या प्रवाशांसाठी रेल्वेने तातडीने प्रवाशांचा प्रवास खंडित होऊ नये म्हणून त्यांना दुसऱ्या रेल्वे संचात हलवण्यात आले. ठझ्रऋ आणि तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी प्रवाशांना प्लॅटफॉर्मवरील विश्रामगृहात पोहोचवण्यास मदत केली. प्रवाशांसाठी अन्नाची आणि पाण्याची व्यवस्थाही करण्यात आली.

या घटनेमुळे पुणे स्थानकावरील इतर गाड्यांच्या वेळापत्रकावर किंचित परिणाम झाला असून काही गाड्या १५ ते ३० मिनिटे उशिराने धावत होत्या. युद्धपातळीवर काम करून रुळावरून घसरलेला डबा पुन्हा रुळावर आणण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते.



आभार

नमस्कार
मी, वैभव मधुकरराव पिचड,
माझ्यावर प्रेम करणाऱ्या सर्व हितचिंतक, कार्यकर्ते, मित्रपरिवार, ज्येष्ठ नागरिक, मान्यवर आणि पिचड कुटुंबाशी आत्मीयतेने जोडलेल्या प्रत्येक व्यक्तीचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

आज माझ्या वाढदिवसानिमित्त आपण सर्वांनी विविध माध्यमांतून व्यक्त केलेल्या शुभेच्छा, सदिच्छा, आशीर्वाद आणि प्रेमाचा वर्षाव मनाला अत्यंत स्पर्शून गेला. प्रत्यक्ष भेटता आले नाही, प्रत्येकाच्या समोर उपस्थित राहता आले नाही, तरी सोशल मीडियाच्या माध्यमातून, फोनद्वारे, संदेशांद्वारे आणि अनेकांनी मनापासून व्यक्त केलेल्या भावना माझ्यापर्यंत पोहोचल्या. त्या प्रत्येक शब्दामध्ये दिसणारे प्रेम, विश्वास आणि आपुलकी हीच माझ्यासाठी सर्वात मोठी ताकद आहे.

गेल्या काही दिवसांपासून प्रकृती अस्वस्थ असल्यामुळे आणि उपचार सुरू असल्याने आपण सर्वांमध्ये प्रत्यक्ष येणे शक्य झाले नाही, ही खंत मनात आहे. नेहमी आपल्या लोकांमध्ये राहण्याची सवय असताना काही काळ दूर राहावे लागणे निश्चितच मनाला वेदना देणारे आहे; परंतु या काळात आपण सर्वांनी दाखवलेली आत्मीयता आणि दिलेला मानसिक आधार माझ्यासाठी औषधासारखाच ठरला आहे. अनेकांनी प्रार्थना केल्या, अनेकांनी आशीर्वाद दिले, तर अनेकांनी लवकर बरे व्हा, पुन्हा जोमाने या असे सांगत दिलेला विश्वास माझ्या मनाला नव्याने बळ देऊन गेला.

राजकारणात कार्यकर्ता आणि नेता यांचे नाते केवळ संघटनापुरते मर्यादित नसते, ते विश्वास, प्रेम आणि एकमेकांप्रती असलेल्या बांधिलकीवर उभे असते. आज आपल्या सर्वांच्या भावना पाहताना हे नाते किती घट्ट आणि जिव्हाळ्याचे आहे, याची पुन्हा जाणीव झाली. माझ्यावर असलेले आपले प्रेम, माझ्या कुटुंबाविषयीची आपुलकी आणि पिचड कुटुंबावर ठेवलेला विश्वास ही आमची सर्वात मोठी संपत्ती आहे.

या कठीण काळात प्रत्येक शुभेच्छा, प्रत्येक संदेश आणि प्रत्येक प्रार्थना मला लढण्याची नवी ऊर्जा देत आहे. आपल्या सर्वांच्या प्रेमामुळे, आशीर्वादामुळे आणि सदिच्छांमुळे मी लवकरच पूर्णपणे बरा होऊन पुन्हा पूर्वीप्रमाणे सक्रियपणे आपल्यामध्ये उभा राहीन, असा मला ठाम विश्वास आहे. जनतेसाठी काम करणे, कार्यकर्त्यांच्या सोबत राहणे आणि आपल्या भागाच्या विकासासाठी झटणे हीच माझी खरी ऊर्जा आहे, आणि तीच ऊर्जा घेऊन मी पुन्हा नव्या जोमाने कामाला लागेन.

आपल्या प्रत्येक शुभेच्छा मी मनापासून स्वीकारतो आणि पुन्हा एकदा सर्वांचे ऋणी असल्याची भावना व्यक्त करतो. आपण असेच प्रेम, विश्वास आणि आशीर्वाद कायम ठेवावेत, ही नम्र विनंती.

मनःपूर्वक धन्यवाद!
– वैभव मधुकरराव पिचड

विद्याचंद्र सातपुते (वीरभूमी अकोले ता. प्रतिनिधी) मो. ९४०४६९६३०५

## SPOT NEWS



### वन्यजीवांसाठी प्रभाकरम फाउंडेशनने पाणवठ्यामध्ये टँकरने सोडले पाणी

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
उन्हाळ्याच्या तीव्र झळा वाढत असताना जंगलातील नैसर्गिक पाण्याचे स्रोत आटत चालले आहेत. या पार्श्वभूमीवर प्रभाकरम फाउंडेशनने सामाजिक बांधिलकी जपत चास येथील वनविभागाच्या पाणवठ्यामध्ये टँकरद्वारे पाणी सोडण्याचा उपक्रम राबविला. दरवर्षीप्रमाणे यंदाही फाउंडेशनकडून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात आला. फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी संबंधित पाणवठ्याची पाहणी करून टँकरच्या माध्यमातून पाणी सोडले. यामुळे बिबटे, हरिण, ससा, कोल्हा, माकड तसेच विविध पशु-पक्ष्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. पाण्याअभावी वन्यप्राण्यांना मानवी वसाहतीकडे वळण्याची वेळ येऊ नये आणि त्यांचे नैसर्गिक अधिवास सुरक्षित राहावेत, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. या उपक्रमावेळी फाउंडेशनचे अध्यक्ष विपुल तापकीर, उपाध्यक्ष अभिषेक थोरात, सौरभ गावखरे आदी उपस्थित होते.

### माणिकताई करंदीकर विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनींना ‘माहेर’ भेटीचा आनंद

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
येथील जानकीबाई आपटे बालिका आश्रम संस्था संचलित माणिकताई करंदीकर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, बालिकाश्रम रोड येथील मुलींच्या शाळेच्या १९६५ पासून आजपर्यंतच्या माजी विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या मैत्रिणी, शिक्षक आणि शाळेच्या आठवणींनी संपूर्ण परिसर अक्षरशः भारावून गेला. या मेळाव्यास राज्यभरातून सुमारे पाचशेहून अधिक माजी विद्यार्थिनी उपस्थित राहिल्या. पुणे, ठाणे, कल्याण, मुंबई, औरंगाबाद, नाशिक तसेच जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या विद्यार्थिनींनी पुन्हा एकदा शाळेच्या आवारात आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. कोणी आजी, कोणी आई, काकू, मावशी झालेल्या या सर्वांनी एकमेकींना भेटताच जुन्या आठवणींमध्ये हरवून गेल्या. शाळेतील वर्ग, मैदान आणि परिसर मैत्रीच्या हास्याने गजबजून गेला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. निरज करंदीकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या सचिव सौ. दीप्ती करंदीकर, माजी विद्यार्थिनी व विद्यमान नगरसेविका आशा डागवाले, नगरसेविका सुनीता फुलसौंदर, बुरुडगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश्री कुंटला, बालिकाश्रम बालक मंदिर प्राथमिक शाळेच्या माजी मुख्याध्यापिका राधिका लगड, सेवानिवृत्त ज्येष्ठ शिक्षिका हेमा चाफेकर यांची उपस्थिती होती. यावेळी विद्यालयाचे आजी-माजी शिक्षकवृंदही मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य अनिल सुद्रिक यांनी केले. सर्व माजी विद्यार्थिनींना स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन वीणा दिघे यांनी केले, तर किशोर अहिरे यांनी आभार मानले.

# शिर्डीत राष्ट्रसंत गाडगेबाबा साहित्य संमेलन उत्साहात

**राजेंद्र फंड यांचे प्रभावी मार्गदर्शन । १५० व्या जयंतीनिमित्त आयोजन; समाजप्रबोधन, स्वच्छता व मानवतेचा दिला संदेश**

**शिर्डी । वीरभूमी –**
राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आयोजित २८ व्या राष्ट्रसंत गाडगेबाबा मराठी साहित्य संमेलनात संमेलनाध्यक्ष राजेंद्र फंड यांनी आपल्या ओजस्वी आणि प्रेरणादायी भाषणातून समाजप्रबोधनाचा संदेश दिला. २६ एप्रिल २०२६ रोजी शिर्डी येथील हॉटेल जे. के. पॅलेस येथे हा एकदिवसीय सोहळा उत्साहात पार पडला.



संमेलनाध्यक्ष राजेंद्र फंड यांनी आपल्या समारोपीय भाषणात राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जीवनकार्याचा सखोल आढावा घेत त्यांच्या दशसूत्री जीवनमार्गदर्शन या विचारसरणीचे महत्त्व अधोरेखित केले. साधेपणा, स्वच्छता, सेवा, सत्य आणि समाजोपकार ही मूल्ये आजच्या समाजासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

गाडगेबाबांनी शिक्षण, स्वच्छता, समाजसेवा आणि अंधश्रद्धा निर्मूलनासाठी केलेले कार्य आजही प्रेरणादायी असल्याचे सांगताना त्यांनी गरीब, अनाथ आणि वंचित घटकांसाठी केलेल्या त्यांच्या कार्याची विशेष दखल घेतली. देव दगडात नाही, तो माणसात आहे आणि गाव स्वच्छ ठेवा, मन स्वच्छ ठेवा या त्यांच्या संदेशांचा उल्लेख करत त्यांनी उपस्थितांना हे विचार आचरणात आणण्याचे आवाहन केले.

या संमेलनात डेबूजी प्रतिष्ठानच्या वतीने राष्ट्रीय डेबूजी संत गाडगेबाबा पुरस्काराचे वितरण भारतीय धोबी महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री. एकनाथराव बोरसे आणि सहा भारतीय पेटंटचे मानकरी तसेच संदीप विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. प्रसाद बाविस्कर, २८ व्या राष्ट्रसंत गाडगेबाबा मराठी साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष राजेंद्र फंड व ग्रामसेवा संदेश दिवाळी अंकाचे संपादक डॉ. एकनाथराव ढाकणे यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. पांडुरंग गुंजाळ, एकनाथराव बोरसे, गणेश दळवी, डॉ. मोहन गायकवाड, राष्ट्रीय भारुडकर हमीद सय्यद, चित्रकार रवी भागवत, अनिल हुपरीकर, मनोज म्हस्के, राष्ट्रीय कीर्तनकार खंडोजी गायकवाड यांना मरणोत्तर पुरस्कार प्रदान करण्यात आले.

याशिवाय डॉ. प्रसाद बाविस्कर, सुषमा अमृतकर, रजनी लुंगसे, डॉ. एकनाथराव ढाकणे, विलास रोकडे, राजेंद्र देसाई व विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात आले. साहित्य, समाजसेवा, शिक्षण, उद्योग आणि कला क्षेत्रातील पुरस्कारांद्वारे गाडगेबाबांच्या विचारांचा प्रसार करण्याचा प्रयत्न करण्यात आला. विशेष म्हणजे, सन्मानार्थींना समर्पित टपाल तिकीटाचे अनावरणही करण्यात आले, ज्यामुळे त्यांच्या कार्याची नोंद समाजाच्या स्मरणात राहील.

राजेंद्र फंड यांच्या जीवनदीप गाडगेबाबांचा या कवितासंग्रहासह इतर आठ कवितासंग्रहांचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. संमेलनातून राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या विचारांची नव्याने उजळणी झाली असून समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याची प्रेरणा मिळाली, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

संमेलन यशस्वी करण्यासाठी आयोजक सुनील निकम, कवी सरकार, सुधाकर वाघ, अनिल देसाई, विलास रोकडे, रोहित रोकडे, सौ. राजश्री फंड यांनी परिश्रम घेतले.

## कापड बाजार मधील नो हॉकर्स झोन व ‘पे अँड पार्क’ला विरोध

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
शहरातील कापड बाजार, मोची गल्ली आणि शहाजी रोड परिसरात महापालिका प्रशासनाच्या वतीने प्रस्तावित ‘नो हॉकर्स झोन’ आणि ‘पे अँड पार्क’ योजनेला हॉकर्स युनिटी असोसिएशनच्या वतीने तीव्र विरोध दर्शविण्यात आला आहे.

यासंदर्भात सोमवारी (दि. २७ एप्रिल) महापालिकेत अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर यांच्या उपस्थितीत झालेल्या सुनावणीत असोसिएशनच्या शिष्टमंडळाने आपली भूमिका ठामपणे मांडत हरकती नोंदवल्या आणि निवेदन दिले.

या वेळी हॉकर्स युनिटी असोसिएशनचे अध्यक्ष साहेबान जहागीरदार, संतोष रासने, नवेद शेख, अन्सार पठाण, फिरोज पठाण, लक्ष्मी शिंदे, सुनीता शिंदे, दत्ता शिंदे, रुक्मिणी बिदरे, अलीम गफ्फार, सज्जाद रंगरेज, जावेद शेख, अन्सार पठाण, मुजाहिद पठाण, नितीन वाळके, नितीन पवार, हमजा शेख, अशरफ सय्यद, मीनाक्षी शिंगी, लता वाघमारे, परविन बागवान, अल्फिया शेख, कादर शेख, तारीक तांबोळी आदींसह हॉकर्स महिला व बांधव उपस्थित होते.

शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनात नमूद केले की, मागील ४० ते ५० वर्षांपासून पथविक्रेते या परिसरात व्यवसाय करत असून, ते नियमितपणे महापालिकेला कर भरत आहेत. अचानक या भागाला ‘नो हॉकर्स झोन’ घोषित केल्यास हजारो कुटुंबांवर उपासमारीची वेळ येईल. त्यामुळे हा निर्णय तात्काळ रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली.

## शेवगावात गोसंरक्षण व व्यवसाय नियमनासाठी सकल हिंदू समाजाचे तहसीलदारांना निवेदन

**कत्तलखाने, मटण व चिकन दुकाने नियमांनुसार तपासण्याची मागणी**

**शेवगाव । वीरभूमी–**
शेवगाव शहर व तालुक्यातील सकल हिंदू समाजाच्या वतीने तहसील कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनाद्वारे राज्यभर सुरू असलेल्या गोसंरक्षणाच्या मागणीला पाठिंबा दर्शवण्यात आला तसेच स्थानिक स्तरावर संबंधित व्यवसायांचे शासकीय नियमांनुसार नियमन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.



निवेदनामध्ये गोसंरक्षण, गोसंवर्धन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत गोवंशाचे असलेले महत्त्व अधोरेखित करण्यात आले. शासनाने विद्यमान कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी तसेच जनजागृती आणि संवर्धनाच्या उपाययोजना अधिक बळकट कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

यासोबतच शहरातील मटण, चिकन दुकाने व कत्तलखान्यांची शासकीय परवाने, स्वच्छता निकष, आरोग्यविषयक नियम आणि स्थानिक प्रशासनाच्या अटींच्या अनुषंगाने तपासणी करण्यात यावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले. नियमांचे पालन सुनिश्चित करून सर्व व्यवसाय अधिक पारदर्शक व शिस्तबद्ध पद्धतीने चालावेत, हीच प्रमुख अपेक्षा असल्याचे सांगण्यात आले.

सार्वजनिक आरोग्य, स्थानिक भावना आणि कायदा-सुव्यवस्था लक्षात घेऊन प्रशासनाने विषयाची सकारात्मक दखल घ्यावी, अशी विनंती करण्यात आली. यावेळी विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी व नागरिक उपस्थित होते.

# पाथर्डीत ‘पार्थ समर कॅम्प २.०’ ला उत्साहात सुरुवात

**समर कॅम्पमुळे मुलांचा तणाव कमी होऊन व्यक्तिमत्व विकासास चालना : अनंत ढोले**

**पाथर्डी । वीरभूमी–**
परीक्षेनंतर लहान मुलांना मित्रांसमवेत खेळणे तसेच अभ्यासाव्यतिरिक्त विविध मनोरंजनात्मक उपक्रम शिकण्याची संधी मिळावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या ‘पार्थ समर कॅम्प २.०’ ला पाथर्डी शहरात उत्साहात सुरुवात झाली. समर कॅम्प मुलांना परीक्षेनंतर तणावमुक्त होण्यास मदत करतात, असे प्रतिपादन चैतन्य उद्योगसमूहाचे अध्यक्ष अनंत ढोले यांनी केले.

ते येथील विवेकानंद विद्या मंदिरच्या प्रांगणात अभय आव्हाड सामाजिक प्रतिष्ठानतर्फे आयोजित समर कॅम्पच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व पाथर्डीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड, प्रा. रमेश मोरगावकर, अशोकराव चोरमले, संतोष डागा, भारतीताई असलकर, कुणाल आव्हाड, प्राचार्य डॉ. बबन चौरे, मुख्याध्यापक शरद मेढे, अनुजा कुलकर्णी, डॉ. विजय देशमुख, संपत घारे, ज्ञानेश्वर गायके आदी उपस्थित होते.

अनंत ढोले पुढे म्हणाले की, समर कॅम्पमध्ये मुलांना केवळ पुस्तकी नव्हे तर व्यावहारिक ज्ञान मिळते, जे त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे. सर्जनशीलता वाढविण्यासोबतच विविध कौशल्यांचा विकास करण्यासाठी समर कॅम्प उपयुक्त ठरतात. मुलांच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी पालकांनी त्यांना अशा उपक्रमांमध्ये सहभागी करून घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी प्रा. रमेश मोरगावकर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत समर कॅम्पचे महत्त्व अधोरेखित केले.

एक आठवडा चालणाऱ्या या समर कॅम्पमध्ये पाथर्डी शहरातील एकूण १२२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. प्रशिक्षित क्रीडा शिक्षकांकडून फुटबॉल, व्हॉलीबॉल, क्रिकेट, आर्चरी, योगाभ्यास यांसारख्या खेळांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच आर्ट अँड क्राफ्ट, सामान्यज्ञान, अबॅकस, इंग्रजी फनी गेम्स आणि नृत्याचेही प्रशिक्षण दिले जाणार आहे. सहभागी विद्यार्थ्यांना दररोज पौष्टिक आहार देण्यात येणार असून आकर्षक बक्षिसांचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

पार्थ समर कॅम्पची सुरुवात




मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आली. उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक शरद मेढे यांनी केले, सूत्रसंचालन अनुजा कुलकर्णी यांनी केले, तर आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर गायके यांनी मानले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांनी ३० जूनपर्यंत कागदपत्रे सादर करावीत

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

विशेष सहाय्य योजनेचा लाभ घेत असलेल्या लाभार्थ्यांनी १ एप्रिल ते ३० जून २०२६ या कालावधीत तहसील कार्यालय, पारनेर अथवा त्यांच्या गावातील तलाठी यांच्याकडे हयात असल्याची नोंद करावी. तसेच एप्रिल ते जून २०२६ या कालावधीत आवश्यक ती कागदपत्रे ३० जून २०२६ पर्यंत जमा करण्याचे आवाहन पारनेरच्या तहसीलदारांनी केले आहे. ज्या लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेंतर्गत लाभ मिळत आहे, अशा लाभार्थ्यांनी तहसीलदारांकडील २०२५-२६ या कालावधीतील उत्पन्नाचा दाखला, हयातीचे प्रमाणपत्र आणि आधार कार्डाची छायांकित प्रत ३० जून २०२६ पर्यंत जमा करावीत. तसेच या दोन्ही योजनांतील ५० वर्षे व त्यापुढील वयोगटातील लाभार्थ्यांनी उत्पन्नाचा दाखला दरवर्षी न देता तो पाच वर्षांतून एकवेळेस द्यावा.

## महापालिकेचे आरोग्य केंद्र नागरिकांसाठी आधार : उडाणशिवे

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

अहिल्यानगर शहरातील सर्वात मोठी आणि जुनी झोपडपट्टी म्हणून ओळख असलेल्या रामवाडी परिसरात आरोग्य सुविधांच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे. येथे प्रमुख्याने कचरा वेचक, कष्टकरी कामगार व रोजंदारीवर उदरनिर्वाह करणारा वर्ग मोठ्या प्रमाणात वास्तव्यास असून, या नागरिकांसाठी आरोग्य सेवा पूर्वी मोठे आव्हान होते. मात्र त्यांच्या आरोग्याचा प्रश्न सुटण्यास मदत होत असल्याचे प्रतिपादन उडाणशिवे यांनी केले. महानगरपालिकेच्या वतीने रामवाडी येथे उभारण्यात आलेले आरोग्य केंद्रात समता फाउंडेशनच्या वतीने आयोजित मोफत नेत्र तपासणी शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## रंभाबाई मुळे यांचे निधन

**● निघोज । वीरभूमी–**



पारनेर तालुक्यातील पठारवाडी येथील गं. भा. रंभाबाई मार्तंड मुळे (वय ७४ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्या धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांचे नामजप, अखंडपणे चालू होते. ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्यात पाठीमागे दिंडी क्रमांक ५८ च्या निष्ठावान पाईक होत्या. वै. गुरुवर्य डॉ. सारंग महाराज, वै. गुरुवर्य विठ्ठल महाराज घुले, यांच्या त्या अनुग्रहीत होत्या. डॉ. नारायण महाराज जाधव बाबा आळंदी यांच्यावर त्यांची नितांत श्रद्धा होती. सुरुवातीपासूनच दिंडीमध्ये सर्व वृद्ध माता भगिनींना सांभाळून घेऊन त्यांचे बरोबर उत्कृष्टपणे वारकऱ्यांसाठीचा प्रसाद तयार करण्याची सेवा त्या करीत होत्या. त्यांच्या अकाली जाण्याने सुपेकर परिवार, मुळे परिवार, तसेच परिसरातील सर्व वारकऱ्यांवर दुःखाची छाया पसरली. त्यांचा अंत्यविधी पठारवाडी येथे सर्व महाराज मंडळी व भजनी मंडळाच्या आजी-माजी अध्यक्षासहित मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्या पश्चात मुली, पुतणे, भाऊ असा मोठा परिवार आहे. सौ. इंदुमती पोपट खोसे, संगीत विशारद सौ. मंदा दत्तात्रय लामखडे यांच्या त्या मातोश्री तर जनार्दन मुळे, रेवजी मुळे, भास्कर मुळे, यांच्या त्या चुलती होत.

# कोपरगावात 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचे जल्लोषात स्वागत

**दुष्काळमुक्त महाराष्ट्राचा निर्धार : मंत्री राधाकृष्ण विखे पाटील । जलसंवर्धनासाठी लोकसहभागाची गरज : आ. आशुतोष काळे**

**● कोपरगाव । वीरभूमी –**

महायुती शासनाच्या माध्यमातून राज्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत असून 'गोदा ते नर्मदा' जलयात्रा दुष्काळी भागाला जलमय करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार व उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आणि जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून आयोजित 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचे सोमवार (दि. २७) रोजी कोपरगाव येथे आगमन झाले. यावेळी श्री साईबाबा तपोभूमी येथे आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कोपरगाव मतदारसंघातील नागरिकांच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले.



शिर्डीकडून येणाऱ्या जलयात्रेचे शहरात ढोल-ताशांच्या गजरात आणि फटाक्यांच्या आतषबाजीत स्वागत करण्यात आले. आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते पवित्र जलकलशावर पुष्पवृष्टी करून विधिवत पूजन करण्यात आले. शहरातील विविध ठिकाणी रांगोळ्या काढून जलयात्रेचे स्वागत करण्यात आले होते.

यावेळी जलयात्रेसोबत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार रामराम वडकुते, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार सदाभाऊ खोत आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार आशुतोष काळे आपल्या भाषणात म्हणाले की, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर या अत्यंत दूरदर्शी व प्रजाहितदक्ष शासक होत्या. त्यांनी आपल्या काळात जलसंधारण व जलव्यवस्थापनाला विशेष प्राधान्य दिले. त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्यासाठी आणि महाराष्ट्र कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्यासाठी 'गोदा ते नर्मदा' जलयात्रा महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

ते पुढे म्हणाले की, जलसंधारणाचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवून लोकसहभागातून शाश्वत जलव्यवस्थापनाची चळवळ उभी करण्यासाठी ही जलयात्रा एक ठोस पाऊल आहे. पाणी हेच उद्याचे भविष्य असल्याचे अधोरेखित करत त्यांनी प्रत्येक थेंब जपून वापरण्याचा संदेश दिला.

यावेळी समता पतसंस्थेचे संस्थापक-अध्यक्ष काका कोयटे, महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन ट्रस्टचे सचिव धरमचंद बागरेचा, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन प्रवीण शिंदे, माजी व्हा. चेअरमन पद्माकांत कुदळे, काकासाहेब जावळे तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामपंचायतींचे प्रतिनिधी, जलसंपदा विभागाचे अधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उन्हाच्या तीव्रतेमुळे पशु-पक्ष्यांचे हाल; नागरिकांनी मदतीसाठी पुढे यावे

**● अकोले । वीरभूमी–**

तालुक्यात सध्या उन्हाचा तडाखा प्रचंड वाढला असून त्याचा सर्वाधिक फटका पशु-पक्ष्यांना बसत आहे. तापमानात झालेल्या झपाट्याने वाढीमुळे पाण्याचे स्रोत आटत चालले आहेत, तर अन्नाचीही कमतरता जाणवत आहे. परिणामी अनेक पक्षी आणि भटक्या प्राण्यांची अवस्था बिकट झाली असून त्यांना अन्न-पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

या पार्श्वभूमीवर अकोले तालुक्यातील वीरगाव येथील पक्षीप्रेमी ओमकार अस्वले यांनी पुढाकार घेत नागरिकांना महत्त्वाचे आवाहन केले आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत आपल्या घरासमोर, गच्चीवर किंवा अंगणात पक्ष्यांसाठी पाण्याची छोटी भांडी ठेवावीत, तसेच शक्य असल्यास धान्य टाकून अन्नाची व्यवस्था करावी, असे त्यांनी सांगितले आहे.

ओमकार अस्वले यांनी स्वतः ही विविध ठिकाणी पाण्याची भांडी ठेवून तसेच पशु-पक्ष्यांसाठी अन्नाची सोय करून एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे परिसरात जनजागृती होत असून अनेक नागरिकही यात सहभागी होत आहेत.



उन्हाळा आपल्यासाठी त्रासदायक असला तरी पशु-पक्ष्यांसाठी तो जीवघेणा ठरू शकतो. थोडासा प्रयत्न केला तर आपण त्यांच्या जीवाला आधार देऊ शकतो, असे भावनिक आवाहन त्यांनी केले.

सामाजिक बांधिलकी जपत प्रत्येकाने या उपक्रमात सहभागी होऊन पशु-पक्ष्यांचे प्राण वाचवण्यासाठी हातभार लावावा, असेही त्यांनी नागरिकांना आवाहन केले आहे.

## महसूल विभागातील पक्षपाती निर्णयांना आळा घालण्यासाठी कठोर कायद्यांची मागणी

**जनसंवाद कार्यक्रमात पंकज होन यांचे महसूलमंत्र्यांना निवेदन**

**● कोपरगाव । वीरभूमी–**

महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांकडून जाणूनबुजून चुकीचे व पक्षपाती निर्णय दिले जात असल्याच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर दंडात्मक व उत्तरदायित्व निश्चित करणाऱ्या कायदेशीर तरतुदी करण्यात याव्यात, अशी मागणी पंकज तुळशीराम होन यांनी केली आहे.

शिर्डी येथे आयोजित जनसंवाद कार्यक्रमादरम्यान त्यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना सविस्तर निवेदन सादर केले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, काही ठिकाणी महसूल अधिकारी स्वार्थ किंवा आर्थिक व्यवहारांच्या प्रभावाखाली निर्णय घेत असल्याने सामान्य नागरिकांना अन्याय सहन करावा लागतो. परिणामी, नागरिकांना अपील, पुनर्विलोकन किंवा न्यायालयीन प्रक्रियेकडे वळावे लागते, ज्यामुळे आर्थिक, मानसिक व वेळेचा मोठा ताण निर्माण होतो.

अधिकाऱ्यांच्या चुकीच्या निर्णयांचा फटका थेट सर्वसामान्य नागरिकांना बसत असल्याने अशा प्रकरणांमध्ये संबंधित अधिकाऱ्यांवर वैयक्तिक जबाबदारी निश्चित करणे अत्यावश्यक असल्याचे होन यांनी नमूद केले.

त्यांनी पुढे सुचवलेल्या उपाययोजनांमध्ये दोषी अधिकाऱ्यांकडून न्यायालयीन खर्च वसूल करणे, अन्यायग्रस्तांना दुप्पट नुकसानभरपाई देणे, स्वतंत्र चौकशी यंत्रणा स्थापन करणे, सेवा नोंदीत नोंद करणे तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत फौजदारी कारवाई अनिवार्य करणे यांचा समावेश आहे.

प्रत्येक निर्णय पारदर्शक व कारणांसहित ऑनलाइन उपलब्ध झाल्यास प्रशासनावर नागरिकांचा विश्वास वाढेल आणि मनमानीला आळा बसेल, असेही त्यांनी नमूद केले.

याशिवाय, अपील प्रक्रियेसाठी निश्चित कालमर्यादा ठरविणे आणि अपीलमध्ये निर्णय उलट झाल्यास संबंधित प्रकरणाची स्वयंचलित चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

प्रशासनातच न्याय मिळाला तर नागरिकांना कोर्ट-कचेऱ्यांची पायरी चढण्याची वेळ येणार नाही, असे होन यांनी स्पष्ट केले.

या प्रस्तावित उपाययोजनांमुळे महसूल प्रशासनात पारदर्शकता, जबाबदारी व कार्यक्षमता वाढेल, भ्रष्टाचाराला आळा बसेल तसेच न्यायालयांवरील प्रलंबित प्रकरणांचा भार कमी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. अन्यथा महसूलकडे प्रलंबित असलेली सर्व प्रकरणे दिवाणी न्यायालयाकडे वर्ग करून त्यांचा जलदगतीने निपटारा करण्यात यावा, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

# बाबुजी आव्हाड महाविद्यालयास 'उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय' पुरस्कार

**महाविद्यालयाचा क्रीडा क्षेत्रात दबदबा । सलग दुसऱ्या वर्षी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पुरस्कार**

**● पाथर्डी । वीरभूमी–**

क्रीडा क्षेत्रातील सातत्यपूर्ण कामगिरी आणि शिस्तबद्ध आयोजनाच्या जोरावर पाथर्डी येथील पार्थ विद्या प्रसारक मंडळाच्या बाबुजी आव्हाड महाविद्यालयाने आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अहिल्यानगर विभागातर्फे दिला जाणारा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा प्रतिष्ठेचा 'उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय' पुरस्कार या महाविद्यालयाला प्रदान करण्यात आला. विशेष म्हणजे, सलग दुसऱ्या वर्षी हा बहुमान मिळवून महाविद्यालयाने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

मिरजगाव येथील नूतन महाविद्यालयात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सोहळ्याला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. सुदाम शेळके, माजी संचालक डॉ. दिपक माने, जिल्हा क्रीडा समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. तानाजी जाधव, सचिव डॉ. राजेंद्र देवकाते उपस्थित होते.

पुरस्काराचा स्वीकार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. विजय देशमुख यांच्यासह प्रा. डॉ. अरुण राख, प्रा. डॉ. अशोक डोळस, प्रा. डॉ. अजयकुमार पालवे व प्रा. डॉ. आनंद घोंगडे आदी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष अभय आव्हाड यांनी या यशाचे श्रेय खेळाडूंच्या मेहनतीला व उत्कृष्ट मार्गदर्शनाला दिले आहे.

बाबुजी आव्हाड महाविद्यालयाने या शैक्षणिक वर्षात आंतर महाविद्यालयीन, आंतर विभागीय, अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा व 'खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स' मध्ये सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकांची लयलूट केली आहे. आंतर महाविद्यालयीन स्पर्धेमध्ये

वेटलिफ्टिंग व पॉवरलिफ्टिंग (मुले/मुली) संघाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. आर्चरी (मुली) संघाने विजेतेपद मिळवले. तर मुलांच्या क्रॉसकंट्री संघाने सांघिक उपविजेतेपद पटकावले. महाविद्यालयाच्या एकूण ७ खेळाडूंनी अखिल भारतीय आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग व क्रिकेट स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व केले आहे. ३० खेळाडूंची आंतर विभागीय स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्हा संघात निवड झाली.



महाविद्यालयाने केवळ खेळाडू घडवण्यातच नव्हे, तर स्पर्धा आयोजनातही मोलाची भूमिका बजावली आहे. या वर्षात महाविद्यालयाने आंतर महाविद्यालयीन स्तरावर वेटलिफ्टिंग, पॉवरलिफ्टिंग आणि शरीरसौष्ठव या स्पर्धांचे अत्यंत शिस्तबद्ध आयोजन केले. तसेच 'अहिल्यानगर जिल्हा अस्मिता खेलो इंडिया वुमेन्स वेटलिफ्टिंग लीग' आणि 'अहिल्यानगर जिल्हा युथ, ज्युनियर व सिनियर वेटलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धा' यशस्वीपणे पार पाडली.

यापूर्वी देखील महाविद्यालयास 'उत्कृष्ट स्पर्धा आयोजन' हा पुरस्कार मिळाला असून, महाविद्यालयाच्या खेळाडूंनी वेटलिफ्टिंग क्रीडा प्रकारात महाराष्ट्र शासनाचा 'शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार' तसेच जिल्हा पुरस्कार 'गुणवंत खेळाडू' व 'गुणवंत मार्गदर्शक' असे पुरस्कार प्राप्त केले आहेत.

महाविद्यालयाच्या या ऐतिहासिक यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व पाथर्डीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष ॲड. सुरेशराव आव्हाड तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# महाराष्ट्र दुष्काळमुक्तचा संकल्प पूर्ण करण्याचा निर्धार

## जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील | त्र्यंबकेश्वर व चोंडी येथून निघालेल्या जलयात्रांचा शिर्डीत मिलाफ

**● शिर्डी | वीरभूमी –**
संपूर्ण जगाला श्रद्धा आणि सबुरीचा संदेश देणाऱ्या साईबाबांच्या भूमीत पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा जयघोष करत श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर आणि चोंडी येथून निघालेल्या दोन्ही जलयात्रा शिर्डीत दाखल झाल्या. महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प जलयात्रेच्या निमित्ताने पूर्ण करण्याचा निर्धार जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीच्या त्रिशताब्दी वर्षाचे औचित्य साधून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून 'गोदा ते नर्मदा' पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे गोदावरी नदीचे उगमस्थान असलेल्या श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे जन्मस्थळ असलेल्या चोंडी येथून यात्रेला प्रारंभ करण्यात आला. दोन्ही यात्रा शिर्डीत एकत्र येऊन पुढे मध्यप्रदेशकडे सोमवारी रवाना होणार आहेत. राज्यातील विविध नद्यांमधून आणलेल्या जलकलशांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

शिर्डीत जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, खासदार वडतुके, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार सदाभाऊ खोत यांच्यासह शिर्डीकर ग्रामस्थांनी शहरातील मल्हारी मार्तंड मंदिरात पूजन करून यात्रेचे स्वागत केले. शहरातील प्रमुख मार्गांवरून जलकलशांची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी जलसंवर्धन आणि जलव्यवस्थापनाचा संदेश चित्रफितींच्या माध्यमातून देण्यात आला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा पुतळा आणि जलकलशांनी सजलेला रथ हे जलयात्रेचे मुख्य आकर्षण ठरले. धनगर नृत्याने वातावरणात उत्साह निर्माण केला. तसेच मंत्री विखे पाटील आणि सहभागी आमदारांचा बसमधून केलेला प्रवासही चर्चेचा विषय ठरला.

यात्रेनिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जलसंवर्धन चळवळ अत्यंत महत्त्वपूर्ण होती. त्याचबरोबर समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा वारसाही



त्यांनी दिला. श्री दासगणू महाराजांनी 'श्री साईबाबा सुवर्ण मंजिरी' हा ग्रंथ महेश्वर येथे लिहिला, त्यामुळे शिर्डी आणि महेश्वर या नगरींमधील नाते अध्यात्माने जोडले गेले असल्याचे त्यांनी सांगितले.

# मोहटे येथे EPFO च्या 'निधी आपके निकट २.०' शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## पीएफ, केवायसी व पेन्शन तक्रारींचे निवारणाने कर्मचाऱ्यांना दिलासा

**● पाथर्डी | वीरभूमी –**
कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना (EPFO) यांच्या विशेष जनजागृती व तक्रार निवारण मोहिमेअंतर्गत 'निधी आपके निकट २.०' या जिल्हास्तरीय शिबिराचे आयोजन सोमवार, दि. २७ एप्रिल २०२५ रोजी श्री मोहटादेवी देवस्थान, मोहटे येथे करण्यात आले. या शिबिरामध्ये कर्मचारी भविष्य निर्वाह निधीशी संबंधित विविध समस्यांचे जागेवरच निराकरण करण्यात आल्याने सभासद व कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.



शिबिरात पीएफ (PF) रक्कम काढणे, केवायसी (KYC) अद्ययावत करणे, ई-नॉमिनेशन प्रक्रिया पूर्ण करणे तसेच पेन्शनसंदर्भातील तांत्रिक अडचणी अशा विविध तक्रारींचे अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष निवारण करण्यात आले. यामुळे अनेक कर्मचारी व सेवानिवृत्त नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.

यावेळी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाचे प्रवर्तक अधिकारी सुरेंद्र कुलकर्णी, सहाय्यक सुरक्षा अधिकारी सचिन लांडे, सहाय्यक ओम पिंपरकर तसेच देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे उपस्थित होते. शिबिराला कर्मचारी भविष्य निर्वाह निधी सभासद, विविध आस्थापनांतील कामगार, प्रतिनिधी आणि सेवानिवृत्त कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान नवीन ई-सेवा पोर्टलचा वापर कसा करावा, 'उमंग' पद्वारे पीएफची माहिती कशी मिळवावी तसेच उच्च पेन्शन (Higher Pension) पर्यायाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. अधिकाऱ्यांनी उपस्थितांच्या शंकांचे समाधान करून ऑनलाइन सेवांचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन केले.

देवस्थानचे जनसंपर्क अधिकारी भीमराज खाडे यांनी सर्वांचे स्वागत करून आभार मानले.

# श्रीगोंद्यात संभाजी ब्रिगेडचे तिर्डी आंदोलन

## धिरेंद्र शास्त्री व आमदार संजय गायकवाड यांचा केला निषेध

**● श्रीगोंदा | वीरभूमी –**
छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल करण्यात आलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ श्रीगोंदा येथे संभाजी ब्रिगेड, समविचारी संघटना आणि शिवप्रेमी यांच्या वतीने धिरेंद्र शास्त्री (बागेश्वर महाराज) व आमदार संजय गायकवाड यांच्या विरोधात तिर्डी आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनाअंतर्गत शनी चौक ते तहसील कार्यालय असा मोर्चा काढण्यात आला. मोर्चादरम्यान प्रतीकात्मक तिर्डी बांधून ती तहसील कार्यालयाजवळील मुतारी येथे नेण्यात आली. त्यानंतर तहसील कार्यालयासमोर श्रद्धांजली अर्पण करून निषेध व्यक्त करण्यात आला. आंदोलनात मोठ्या संख्येने शिवप्रेमी सहभागी झाले होते.



आंदोलनादरम्यान संभाजी ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षांनी धिरेंद्र शास्त्री व आमदार संजय गायकवाड यांच्यावर तीव्र टीका केली. तसेच आम आदमी पार्टीचे राजेंद्र नागवडे यांनीही श्रद्धांजली अर्पण करून आपला निषेध नोंदवला. नागपूर येथे झालेल्या कार्यक्रमात धिरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल केलेल्या वक्तव्याचा यावेळी निषेध करण्यात आला. तसेच आमदार संजय गायकवाड यांनी 'शिवाजी कोण होता' या पुस्तकाच्या संदर्भात केलेल्या वादग्रस्त वक्तव्य व कथित धमकीच्या घटनेचाही निषेध व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनात बामसेफचे सुभाष बोराडे, सत्यशोधक चळवळीचे कार्यकर्ते भीमराव कोथिंबीरे, आम आदमी पार्टीचे राजेंद्र निळकंठ नागवडे, संभाजी ब्रिगेड तालुकाध्यक्ष वैभव मिसाळ, सामाजिक कार्यकर्ते बंडूतात्या जगताप, शहराध्यक्ष अभिषेक सावंत, अजिजभाई शेख, जिल्हाध्यक्ष अरविंद कापसे, जिल्हा उपाध्यक्ष नाना शिंदे, जिल्हा संघटक गणेश पारे, दीपक मखरे यांसह अनेक कार्यकर्ते व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संजीवनी कार्यस्थळी 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचे बिपीनदादा कोल्हे यांच्याकडून स्वागत

## तुटीच्या गोदावरी खोऱ्यात जलसमृद्धीसाठी प्रयत्न : राधाकृष्ण विखे पाटील

**● कोपरगाव | वीरभूमी–**
दुष्काळमुक्त महाराष्ट्रासाठी महायुती शासनाचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस यांनी प्रभावीपणे काम करत जलसमृद्धी योजनांवर भर दिला आहे. तुटीच्या गोदावरी खोऱ्यात पाण्याची समृद्धी व्हावी यासाठी नदीजोड प्रकल्पांतर्गत ७८ टीएमसी पाणी आणण्याच्या कामाला सुरुवात झाली असून त्यासाठी त्यांचे जाणिवपूर्वक प्रयत्न सुरू आहेत, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

अहिल्यानगर जिल्ह्याच्या कन्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी लोककल्याण, धार्मिक व सांस्कृतिक विकास, मंदिर पुनर्बांधणी, घाट निर्मिती, धर्मशाळा, तीर्थक्षेत्र विकास, लोकहितवादी प्रशासन, जलव्यवस्थापन व लघुसिंचन या क्षेत्रांत महत्त्वपूर्ण कार्य करून जलव्यवस्थापनाला दिशा दिली. त्यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त



जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून राज्यभर 'गोदा ते नर्मदा' जलयात्रा काढण्यात येत असून अहिल्यादेवींच्या कार्याची जनजागृती केली जात आहे.

यावेळी माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' उपक्रमांतर्गत कोपरगाव पंचक्रोशीत शेकडो बंधारे उभारून भूगर्भातील पाणीसाठा वाढविण्यासाठी केलेल्या कार्याचाही उल्लेख करण्यात आला.

आमदार गोपीचंद पडळकर म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रेरणादायी असून अहिल्यादेवींनी घाट, विहिरी, धर्मशाळा व मंदिरांचा जीर्णोद्धार करून मोठे कार्य केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केवळ जलयात्रा काढली नसून महाराष्ट्राला जलसमृद्ध करण्यासाठी व्यापक उपक्रम हाती घेतले आहेत. चौंडी ते महेश्वर अशी ही जलयात्रा राज्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत असून जल है तो कल है या भावनेतून जलव्यवस्थापनाची गरज त्यांनी अधोरेखित केली.

यावेळी खासदार राम वडकुते, माजीमंत्री तथा शेतकरी नेते सदाभाऊ खोत, गोदावरी मराठवाडा जलसंपदा विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगरचे कार्यकारी संचालक संतोष तिरमवार, कोल्हे कारखान्याचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर परजणे, सर्व संचालक, विविध संस्थांचे पदाधिकारी, नगरसेवक, शेतकरी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी नगराध्यक्ष पराग संधान यांनी आभार मानले.

# रेस्टॉरंट, कॅटरर्स, हॉटेल्समध्ये 'चीज अनालॉग' वापराबाबत नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाई

**● अहिल्यानगर | वीरभूमी –**
राज्यातील रेस्टॉरंट, कॅटरर्स, हॉटेल्स तसेच फास्ट फूड विक्रेत्यांकडून 'चीज अनालॉग' या उत्पादनाच्या वापराबाबत ग्राहकांची दिशाभूल होऊ नये, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या अन्नपदार्थांमध्ये 'चीज' ऐवजी 'चीज अनालॉग' वापरले असल्यास त्याची स्पष्ट माहिती देणे बंधनकारक करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन आढळल्यास अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती अन्न सुरक्षा आयुक्त श्रीधर दुबे-पाटील यांनी दिली आहे. ग्राहकांनी अशा प्रकारच्या तक्रारी टोल फ्री क्रमांक १८००-२२२-३६५ वर नोंदवाव्यात, असेही आवाहन करण्यात आले आहे.

भारतामध्ये दूध व दुग्धजन्य पदार्थांचा आहारात महत्त्वाचा वाटा असून 'चीज अनालॉग' हा वनस्पतीजन्य तेल, स्टार्च व इतर घटकांपासून तयार होणारा पर्याय आहे. तो दिसायला व चवीला चीजसारखा असला तरी त्यातील पोषणमूल्ये भिन्न असतात. त्यामुळे ग्राहकांची फसवणूक टाळण्यासाठी संबंधित पदार्थांवर योग्य लेबलिंग करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ तसेच लेबलिंग व डिस्प्ले नियम २०२० नुसार 'चीज' आणि 'चीज अनालॉग' हे स्वतंत्र अन्नपदार्थ आहेत. त्यामुळे 'चीज अनालॉग' वापरल्यास मेन्यूकार्ड, डिस्प्ले बोर्ड तसेच ऑनलाइन ऑर्डर प्लॅटफॉर्मवर त्याची स्पष्ट नोंद करणे आवश्यक आहे. 'चीज' या नावाखाली 'अनालॉग' उत्पादनाची विक्री करणे हा नियमभंग ठरणार आहे.

अन्न व्यावसायिकांना देण्यात आलेल्या निर्देशांनुसार, हॉटेल/रेस्टॉरंट चालकांनी पनीर किंवा चीज अनालॉग खरेदी करताना बिलावर संबंधित पदार्थाचा स्पष्ट उल्लेख आहे की नाही याची खात्री करावी. तसेच ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या अन्नपदार्थांमध्ये वापरलेल्या घटकांची योग्य माहिती देणे आवश्यक आहे. परवाना घेताना दिलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी अद्ययावत ठेवणे बंधनकारक असून चुकीची माहिती दिल्यास कारवाई केली जाणार आहे.